



॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com






अहिल्यानगर ▪ सोमवार, दि. १४ एप्रिल २०२५ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ६ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


## SPOT NEWS

### दिल्लीत ३५० विमाने हवेत जागेवरच थांबली

**नवी दिल्ली** – दिल्ली विमानतळावर शुक्रवारी रात्रीपासून वाईट हवामानामुळे हवाई वाहतूक विस्कळीत झाली. अचानक घोंगावणारे वारे आणि धुळीच्या वादळाने विमानांच्या व्यवस्थापनावर गंभीर परिणाम झाला. परिणामी, शनिवारी ३५० हून अधिक उड्डाणांना विलंब झाला आणि इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली. लँडिंगला परवानगी मिळत नसल्यामुळे विमाने हवेतच जागेवर थांबली होती. विमानांना होत असलेला विलंब आणि विमानतळावर निर्माण झालेल्या गोंधळाच्या स्थितीचे व्हिडीओ प्रवाशांनी सोशल मीडियावर व्हायरल केले.

### फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट; ८ ठार

**अनकापल्ले** – आंध्र प्रदेशातील अनकापल्ले जिल्ह्यातील एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की लोकांना तो अनेक किलोमीटर अंतरापर्यंत ऐकू आला. या स्फोटात कारखान्यात काम करणाऱ्या ८ कामगारांचा मृत्यू झाला. आंध्र प्रदेशातील अनकापल्ले जिल्ह्यातील एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की लोकांना तो अनेक किलोमीटर अंतरापर्यंत ऐकू आला. या स्फोटात कारखान्यात काम करणाऱ्या ८ कामगारांचा मृत्यू झाला.

# धस, क्षीरसागर चौकशीच्या फेऱ्यात

## दोन्ही नेत्यांवर ३९ कोटी रुपयांच्या घोटाळ्याचा आरोप

**बीड । वीरभूमी–**

बीड जिल्ह्यामध्ये २०१४ पूर्वीच्या काँग्रेस-आघाडी सरकारमध्ये मंत्री असलेल्या सुरेश धस, तत्कालीन बीड जिल्हा परिषद शिक्षण सभापती संदीप क्षीरसागर आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला या तिघांनी शिक्षक आंतरजिल्हा बदलीमध्ये तब्बल ३९ कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप ओबीसी नेते बाळासाहेब सानप यांनी केला आहे. या बदली प्रकरणात शिक्षकांकडून प्रत्येकी तीन लाख रुपये घेण्यात आले होते. १३०० हून अधिक शिक्षकांकडून पैसे घेऊन या बदल्या करण्यात आल्या होत्या, असा आरोपही सानप यांनी केला.

बीड येथे पत्रकारांशी संवाद साधताना सानप यांनी बीड जिल्ह्यात आतापर्यंत कधीही बिंदू नामावलीचा विषय आला नव्हता, मग १४ वर्षांनंतर हा मुद्दा उपस्थित करत जाती-जातीत तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न का केला जातोय? असा असा सवाल सानप यांनी उपस्थित केला. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्ये बिंदू नामावलीचे पालन झाले की नाही? हे तपासण्याचे आदेश जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. बीड जिल्ह्यात फोफावणारा जातियवाद रोखण्यासाठी बिंदू नामावलीचे तंतोतंत पालन केले जावे असा आग्रह सुरेश धस यांनी धरला होता.



यासंदर्भात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीड जिल्ह्यातील शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांची एक यादी सोशल मीडियावर व्हायरल केली होती. त्यावर एकाच समाजाचे लोक पदावर कसे काय? बिंदू नामावलिचा नियम बीड जिल्ह्यात लागू होतो की नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. त्यानंतर अजित पवार यांनी या मुद्द्याची गंभीर दखल घेत बिंदू नामावलिनुसारच शासकीय कर्मचारी, अधिकारी यांच्या नियुक्ती आहेत का? हे तपासण्यासाठी समिती स्थापन केली होती.

याच मुद्यावरून आता ओबीसी नेते बाळासाहेब सानप यांनी २०१४ मधील आंतरजिल्हा शिक्षक बदली प्रकरण पुढे करत आमदार सुरेश धस, संदीप क्षीरसागर तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला यांच्यावर थेट पैसे घेऊन तब्बल ३९ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. या संदर्भात शिक्षक संघटनांना सोबत घेऊन लवकरच आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री यांची भेट घेणार असल्याचे सानप यांनी सांगितले.

१४ वर्षांनंतर बीड जिल्हा परिषदेत बिंदू नामावलीचा प्रश्न उद्भवला आहे. ज्यावेळी आंतरजिल्हा बदल्या सुरू होत्या त्या काळात सर्व शिक्षकांनी बीड जिल्ह्यामध्ये आम्हाला परत यायचे आहे, अशी मागणी केली होती. त्यावेळी मंत्री असलेल्या सुरेश धस यांनी तत्कालीन जिल्हा परिषदेचे अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला, शिक्षण सभापती संदीप क्षीरसागर यांना हाताशी धरून शिक्षकांच्या भरत्या केल्या होत्या. तब्बल तेराशे शिक्षकांकडून प्रत्येकी तीन लाख रुपये घेण्यात आले होते. ही रक्कम ३९ कोटी रुपयांच्या वर जाते, असा दावाही सानप यांनी पत्रकार परिषदेत केला. हे सर्व पैसे सुरेश धस, संदीप क्षीरसागर आणि अब्दुल्ला यांच्या खिशात गेले असा थेट आरोपी त्यांनी केला.

दरम्यान सुरेश धस यांनी पंकजा मुंडे मंत्री असताना या भरत्या झाल्या होत्या, असा दावा केला होता. सानप यांनी तो दावाही खोडून काढला. आघाडी सरकार राज्यात सत्तेवर होते आणि त्या मंत्रिमंडळात सुरेश धस मंत्री होते. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही असे सानप यांनी स्पष्ट केले.

# जामखेडच्या दोघा मित्रांची पिंपरी चिंचवडला आत्महत्या



**जामखेड । वीरभूमी–**

जामखेड तालुक्यातील पिंपळगाव उंडा येथील २ मित्रांनी पिंपरी-चिंचवड येथे निर्जनस्थळी जाऊन एकाच झाडाला गळफास घेत आत्महत्या केली आहे. दोन्ही मित्र दोन दिवसांपूर्वी पिंपळगाव उंडा येथून पिंपरी- चिंचवडला गेले होते. शनिवारी दुपारी त्यांचे मृतदेह झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. यापैकी एक जण विवाहित तर दुसरा अविवाहित होता. या दोघांच्या आत्महत्येचे कारण मात्र गुलदस्त्यात आहे.

घटनेची माहिती मिळताच दोघांचेही नातेवाईक पिंपळगाव उंडा येथून घटनास्थळी पोहोचले. पोलिसांकडून त्यांच्या कुटुंबीयांकडे चौकशी केली जात आहे. दोघा मित्रांनी आत्महत्या नेमकी का केली याचे कारण शोधले जात असून आत्महत्या केलेल्यांपैकी तुषार ढगे हा अविवाहित होता. तर दुसरा मित्र सिकंदर शेख याचे लग्न झालेले आहे.

तुषार ढगे याचे वय २५ तर सिकंदर शेख याचे वय ३० वर्षे होते. दोघे एकमेकांचे चांगले मित्र होते. गुरुवारी ते दोघेही पिंपळगाव उंडा येथून पुण्यातील पिंपरी-चिंचवडला गेले होते. मोर्शी येथील भारत माता चौकात ते गेले होते. शनिवारी त्या दोघांचे मृतदेह एकाच वेळी एकाच झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आले. प्राथमिक तपासात त्यांनी आत्महत्या केल्याचे समोर येत आहे. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




SPOT NEWS

## मळगंगा देवीच्या काठीची मिरवणूक उत्साहात; यात्रोत्सवाला प्रारंभ

● **नगर । वीरभूमी–**

राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रोत्सवाला शुक्रवारपासून (दि.११) सुरुवात झाली आहे. शनिवारी (दि.१२) ८५ फूट उंचीच्या काठीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली आहे. मिरवणूकीत गाव व परिसरातील शेकडो भाविक सहभागी झाले होते. दरवर्षी चैत्र अष्टमीला होणाऱ्या यात्रेसाठी लाखो भावीक राज्यातून मोठ्या संख्येने येत असतात. शनिवारी दुपारी मळगंगा देवीच्या हेमांडपंथी बारवे जवळ सकाळी देवीच्या काठीला अभ्यंगस्नान घालण्यात आले. पुजा अर्चा करण्यात आली. त्यानंतर दुपारी चार वाजता काठी सजवण्यात आली. यावेळी मळगंगा देवीचे पुजारी संतोष गायखे व परिवारातील सदस्यांनी भंडारा उधळून काठी मिरवणूकीसाठी सज्ज केली यावेळी उपस्थित भाविकांनी मळगंगा देवीचा जयजकार करीत जयघोष केला. तब्बल तीन तासाच्या मिरवणुकीनंतर ही काठी वाजतगाजत मंदीराजवळ आणण्यात आली या ठिकाणी ही काठी दर्शनासाठी ठेवण्यात आली आहे. काठी उभी राहिल्यानंतर निघोज परिसरातील शेतीचे औत, काठीचे कामे यात्रा होईपर्यंत बंद करतात तसेच कोणत्याही प्रकारचा मांसाहार म्हणजे पशुहत्या या परिसरात होत नाही ही शेकडो वर्षाची परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने पाळली जात आहे. यंदा २१ एप्रिल (सोमवार) हा यात्रेचा मुख्य दिवस असून त्या दिवशी बगाडगाडा मिरवणूक, देवीला अंबीलचा नैवेद्य, छबिना मिरवणूक, देवीच्या हेमांडपंथी बारवेत श्रीं चे घागर दर्शन आदी कार्यक्रम होणार आहेत.

## चंदनापुरी घाटाच्या पायथ्याशी दोन वाहनांचा अपघात; वाहतूक ठप्प

● **संगमनेर । वीरभूमी–**

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील चंदनापुरी घाटाच्या पायथ्याशी दोन वाहनांचा समोरासमोर अपघात झाल्याची घटना शुक्रवारी (दि.११) रात्री सव्वा नऊ ते साडेनऊ वाजेच्या सुमारास घडली आहे. यामुळे वाहतूक ठप्प झाल्याने वाहनचालकांसह प्रवासी, स्थानिक नागरिक अक्षरशः वैतागून गेले होते. गेल्या काही महिन्यांपासून पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग सिमेंट कॉँक्रिटीकरण रस्त्याचे काम सुरू आहे. चंदनापुरी घाटात देखील काम सुरू असल्याने एकाच लेनवरून वाहने ये जा करत आहे. त्यातच जुना चंदनापुरी घाटही सुरू करण्यात आला आहे. पण नियोजनाचा अभाव असल्याने हे अपघात होत आहेत. शुक्रवारी रात्री दोन वाहनांचा एकाच लेनवर समोरासमोर अपघात झाला. दोन्ही वाहने महामार्गावरच होती. यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. या घटनेची माहिती समजताच डोळासणे महामार्ग पोलीस मदत केंद्राच्या पथकासह आजूबाजूच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुमारे दोन तास वाहतुकीचा अक्षरशः फज्जा उडाला होता. क्रेनला पाचारण केल्यानंतर अपघातग्रस्त वाहने बाजूला घेण्यात आल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. यामध्ये दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

# थोरात कारखान्याच्या तत्परतेमुळे डोंगरावरील आग आटोक्यात

### सायखिंडी येथील सह्याद्री देवराई डोंगरावरील आग अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे आटोक्यात

● **संगमनेर । वीरभूमी–**

थोर स्वातंत्र्य सेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर तालुक्यात दंडकारण्य अभियान हे सायखिंडी येथील डोंगरावरूनच सुरू झाले. या परिसरात सह्याद्री देवराई संस्थेने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घेतला असून आज दुपारी लागलेल्या आगीला व्हीजवण्यासाठी थोरात कारखान्याच्या अग्निशामक दलाने तत्परता दाखवल्याने ही आग तातडीने आटोक्यात आली.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने तालुक्याचे हृदय म्हणून काम करताना सातत्याने विकासामध्ये योगदान दिले आहे. याचबरोबर सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने पुढाकार घेतला आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सुरू केलेले दंडकारण्य अभियान ही पर्यावरणाची मोठी लोक चळवळ झाली आहे. वृक्षरोपण व संवर्धनाचे मोठे काम या




चळवळीच्या माध्यमातून दरवर्षी होत आहे.

उन्हाळ्यामध्ये अनेक डोंगरांवर नागरिकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा इतर कारणांमुळे आग लागली जाते आणि त्यातून नैसर्गिक आणि जीवसृष्टीसह वृक्षांची मोठी हानी होते. अशा आगी लागू नयेत याकरता दंडकारण्य अभियान समितीच्या वतीने जनजागृती सातत्याने सुरू असते.

आज दुपारी साईखिंडी येथील सह्याद्री देवराई डोंगरावर लागलेल्या आगीची बातमी कळतात सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अग्निशामक दलाच्या जवानांनी मोठ्या तत्परतेने ही आग विझवली. यासाठी कारखान्याने मोठी मदत केली. यामुळे जंगलाचा मोठा भाग वाचवण्यात यश आले असून जीवसृष्टी व पर्यावरणाची हानी टळली आहे.

सह्याद्री देवराईच्या उभारणीसाठी सिने अभिनेते सयाजी शिंदे त्याचप्रमाणे सह्याद्री देवराईचे प्रणेते सिताराम राऊत व इतर कार्यकर्ते वनविभागाचे कर्मचारी यांनीही अत्यंत मोलाचे काम केले आहे. कारखान्याने केलेल्या तत्परतेच्या मदतीबद्दल सिताराम राऊत यांच्यासह सायखिंडी परिसरातील नागरिकांनी कारखाना व अग्निशामन दलाचे आभार व्यक्त केले आहे.

वन विभाग स्थानिक कर्मचारी आणि कारखान्याच्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या तत्परतेच्या कामाबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, सौ. दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे डॉ. जयश्रीताई थोरात, कारखान्याचे चेअरमन बाबासाहेब ओहोळ, इंद्रजीतभाऊ थोरात, व्हा. चेअरमन संतोष हासे, सर्व संचालक मंडळ व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी अभिनंदन केले आहे.

## नगरमध्ये सिंधी भाषा दिन उत्साहात

● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

सिंधी जनरल पंचायतच्या वतीने सिंधी भाषा दिनानिमित्त अहिल्यानगर मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते संध्याकाळी टू व्हीलर रॅली, शोभायात्रा काढण्यात आली होती त्यामध्ये मोठ्या संख्नेने लोक सहभागी झाले होते.

माळीवाड्या तील टेहूराम मंदिरापासून ते तारकपूर मधील झुलेलाल मंदिरापर्यंत शोभायात्रा काढण्यात आली होती. यामध्ये मोठ्या संख्येने सिंधी बंधू-भगिनी आपल्या टू व्हीलर सह झेंडा घेऊन सहभागी झाले होते, मिरवणुकीत अग्रभागी भगवान झालेला यांचा आकर्षक रथ होता व त्यामागे शेकडो गाड्या होत्या.

प्रथम टेहूराम मंदिरात आरती करण्यात आली नंतर शोभायात्रेला महंत संगमनाथजी महाराज यांनी झेंडा दाखविला व रथाची पूजा केली यावेळी अध्यक्ष महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, जयकुमार रंगलानी, प्रदीप आहूजा, विनोद कुकरेजा, सिंधी जनरल पंचायतचे सर्व सदस्य, समाजातील बंधू-भगिनी, युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना मध्यान म्हणाले, जागतिक सिंधी भाषा दिन १० एप्रिल रोजी साजरा केला जातो, जो भारतीय खंडाच्या पश्चिम भागात असलेल्या ऐतिहासिक सिंध प्रदेशातील इंडो-आर्यन भाषेचा उत्सव आहे. सिंधीहे नाव सिंधू नदीचे मूळ नाव सिंधूवरून आले आहे.ही पाकिस्तान आणि भारत या दोन्ही देशांमध्ये सिंधी लोकांची अधिकृत भाषा आहे. सिंधीचा सर्वात जुना लेखी संदर्भ इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाचा आहे. १० एप्रिल हा दिवस देशभरातसिंधी भाषा दिवसम्हणून साजरा केला जातो. १० एप्रिल १९६७ रोजी आपल्या भारताच्या संविधानात सिंधी भाषेचा समावेश करण्यात आला. तेव्हापासून सिंधी भाषा दिन साजरा केला जात आहे. शोभायात्रा माळीवाडा गणपती, पंचवीस चावडी, कापड बाजार, नेता सुभाष चौक, सर्जेपुरा मार्गे तारकपूर येथील झुलेलाल मंदिरात पोहोचली. तेथे आरती करण्यात आली व प्रसाद वाटपाने सांगता झाली.

## भगवानगड ट्रस्ट संचलित स्पर्धा परीक्षा केंद्रातील आणखी पाच विद्यार्थ्यांचे उज्वल यश

● **पाथर्डी । वीरभूमी–**

पुणे येथील रयत प्रबोधिनी या स्पर्धा परीक्षेतील मार्गदर्शक संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या भगवानगड ट्रस्ट संचलित स्पर्धा परीक्षा केंद्रातील आणखी पाच विद्यार्थ्यांनी विविध शासकीय परीक्षांमध्ये उज्वल यश मिळवले आहे.



मागील वर्षी गडाचे मठाधिपती महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली गडावर सुरु झालेल्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांनी अपार मेहनतीच्या जोरावर अनेकांनी अधिकारीपदाला गवसणी घातली आहे. यावर्षी नानाभाऊ मुंडे, गणेश खेडकर, पवन वायाळ यांची अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती बँक येथे नियुक्ती झाली आहे तर अरुण गर्कळ यांची गोंदिया जिल्ह्यातील आरोग्य विभागात व जय जपकर यांची कार्यकारी सहाय्यक बृहन्मुंबई महानगरपालिका पदावर नुकतीच निवड झाली असून यापूर्वी सूरज अहिरे तलाठी व ग्रामसेवक, किरण सानप महसूल सहाय्यक, सुभाष मोहिते प्राध्यापक, ड.इ.ए.ड. कॉलेज, छत्रपती संभाजीनगर, विजय दहिफळे दारूबंदी विभाग, पोपट जगताप महसूल सहाय्यक, दीपक बटूळे (महसूल सहाय्यक, प्रफुल्ल डोरले कर निरीक्षक, रविकिरण कुटे महसूल सहाय्यक, दीपक आव्हाड महसूल सहाय्यक म्हणून विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या खात्यात अधिकारीपदी निवड झालेली आहे. या निवडीबद्दल श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती न्यायाचार्य डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. आपल्या गडावर कीर्तनकारांसोबतच अधिकारी देखील घडवले जात असल्याने गडाच्या भक्तवर्गात देखील उत्साह व आनंदाचे वातावरण आहे.

भगवानगडावरील स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शास्त्री बाबांनी रयत प्रबोधिनीवरच सोपवली होती.

# समता आणि व्यापारी महासंघाचा उन्हाळ्यातील स्तुत्य उपक्रम

### कोपरगाव शहरातील तहसील कार्यालय येथे उभारली शुद्ध पाण्याची पाणपोई

● **कोपरगाव । वीरभूमी–**

ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील समता नागरी सहकारी पतसंस्था, समता चॅरिटेबल ट्रस्ट, कोपरगाव तालुका व्यापारी महासंघ, कोपरगाव तालुका किराणा मर्चंट असोसिएशन, समता इंटरनॅशनल स्कूल या संस्थांच्या माध्यमातून अनेक सहकार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात नवनवीन योजना व उपक्रम राबवित असून कोपरगावकरांच्या हिताची सामाजिक कार्य करत सामाजिक बांधिलकी जपत आहे.

सध्या उन्हाळा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. या दिवसात पाणी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्या प्रमाणे अन्नदान, रक्तदान हे श्रेष्ठ समजले जातात. त्या प्रमाणे जलदानाला देखील अनन्य साधारण महत्व आहे.

त्यामुळे उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता समता व कोपरगावची बाजारपेठ फुलविण्यात नेहमी अग्रभागी असणाऱ्या व्यापारी महासंघ व तालुका किराणा मर्चंट असोसिएशनच्या माध्यमातून कोपरगाव शहरातील कोपरगाव तहसील कार्यालय या ठिकाणी पिण्याच्या थंड पाण्याची पाणपोई तर शहरातील आठवडे बाजारात फिरती पाणपोई कोपरगावकरांसाठी उपलब्ध करून दिली आहे. गेल्या ८ वर्षापासून समता आणि इतर संस्थांचा हा उपक्रम सुरू असून तालुक्यातील सुत्य उपक्रम समजला जात आहे.

कोपरगाव आगारात शहरातील प्रसिद्ध व्यापारी व समता पतसंस्थेचे संचालक स्व. गुलाबचंद खेमचंद अग्रवाल यांच्या स्मरणार्थ जल मंदिराचे उद्घाटन कोपरगाव तहसीलच्या नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते व कोपरगाव नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ.सुहासिनी ओमप्रकाश कोयटे यांच्या हस्ते करण्यात आले. या पाणपोईमुळे या बस स्थानकात आलेल्या प्रवाशांना जागेवर पाणी देण्याची सुविधा देखील करण्यात आलेली आहे. जागेवर पाणी नेऊन दिल्यामुळे प्रवाशांना जागा जाण्याची भीती नसतेच तसेच त्यांचे सोबत असलेले साहित्य देखील इतरत्र हलू शकत नाही. उन्हाच्या झळायापासून संरक्षण होते. स्वतः जवळ असलेल्या वस्तू चोरीला जाऊ शकत नाही. प्रत्येक उन्हाळ्यात हजाराच्या वर या पाणपोईचा लाभ प्रवासी घेत असतात.

कोपरगाव तहसील मध्ये देखील तहसीलदार महेश सावंत व कोपरगाव नगरपालिका माजी नगराध्यक्षा सौ. सुहासिनी कोयटे यांच्या शुभहस्ते समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने तहसील कार्यालयाला वॉटर कुलर, आ रो मशीन उपलब्ध करून देत येथे पाणपोई सुरू करण्यात आली आहे. शासकीय कामासाठी बाहेर गावाहून माणसांना वॉटर फिल्टर व थंड पिण्याचे पाणी मिळत असल्यामुळे ते सुखद क्षण अनुभवत आहे.

कोपरगाव तालुका व्यापारी महासंघ व कोपरगाव तालुका किराणा मर्चंट असोसिएशन यांच्या वतीने आठवडे बाजाराला येणारे ग्राहक, छोटे - मोठे व्यापारी, किराणा दुकानदारांसाठी फिरती पाणपोई सुरू करून उन्हाळ्यात दर सोमवारी आठवडे बाजारात जलपान सेवा देण्यात येत आहे.

आठवडे बाजारातील पाणपोई उद्घाटन प्रसंगी कोपरगाव तालुका किराणा मर्चंट असोसिएशन अध्यक्ष राजकुमार बंब, व्यापारी महासंघ



कार्याध्यक्ष सुधीर डागा, संचालक महावीर सोनी, आशुतोष पटवर्धन, नरेश शेठ जोशी, हर्षल जोशी तर तहसील कार्यालयातील उद्घाटन प्रसंगी नायब तहसीलदार प्रफुल्लता सातपुते, सौ.जोत्स्ना अरविंद पटेल, श्रेष्ठ नागरिक मित्र मंडळ अध्यक्ष पुष्पलता सुतार, तहसील कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

तसेच कोपरगाव बस स्थानक येथील पाणपोई उद्घाटन प्रसंगी प्रसिद्ध व्यापारी दिपक अग्रवाल, सौ.चित्रा चांगदेव शिरोडे, गुलाबचंद अग्रवाल यांच्या स्नुषा सौ. शिल्पा अग्रवाल, सौ.मोनिका अग्रवाल, आगार लेखाकार सौ.एस.आर.गवळी, वाहतूक निरीक्षक अविनाश गायकवाड, नवनियुक्त वाहतूक निरीक्षक अमित हंपे, वाहतूक नियंत्रक संजीव गाडे, विशाल गुंजाळ, गौतम खरात, सौ.अनिता वाघ, सौ. उज्वला सोनवणे, सौ.प्रतिभा चव्हाण सौ.लता देठे, आशिष कांबळे, विनोद रोहोम, रामहरी गव्हाणे, एच.आर.दराने आदींची उपस्थिती होती.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## नवनागापुरात भरदिवसा घरफोडी; दोन लाखांचा मुद्देमाल लंपास

**● नगर । वीरभूमी–**

नवनागापूरमधील साईराज नगर भागात शुक्रवारी दुपारी घरफोडीची घटना घडून सुमारे दोन लाख १४ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केल्याने परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास सुरु आहे. कुलदीप पंडित विघ्ने (रा. साईराज नगर, नवनागापूर, अहिल्यानगर) यांनी याबाबत एमआयडीसी पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीनुसार, शुक्रवार (दि. ११) रोजी दुपारी कुलदीप विघ्ने व त्यांची आई काही कामानिमित्त घराबाहेर गेले होते. या दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरात प्रवेश केल्यानंतर चोरट्यांनी कपाटाचे लॉक उचकटून त्यातील सोन्याचांदीचे दागिने आणि साठ हजार रुपयांची रोकड असा एकूण दोन लाख चौदा हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. यामध्ये एक तोळ्याची सोन्याची चेन, एक तोळ्याचे सोन्याचे गंठण, नऊ ग्रॅमचे झुंबर, दोन ग्रॅमच्या पळ्या, पाच ग्रॅमची अंगठी यासह चांदीचे दागिन्यांचा समावेश आहे. ही घटना दुपारी उजेडात घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव करीत आहेत.

## माळीवाडा येथे हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

**● नगर । वीरभूमी–**

माळीवाडा येथील शनी–मारुती मंदिर येथे श्री हनुमान जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी जन्मोत्सवाच्यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे पुजारी आदित्यनाथ महाराज यांच्या हस्ते अभिषेक करुन महापुजा करण्यात आली. भजनी मंडळाच्या महिलांनी पाळणा हलवून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी देवस्थानचे सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त रंगनाथ फुलसौंदर, विजय कोथिंबीरे, नितीन पुंड, राजेश पारीख आनंद सत्रे, लक्ष्मीकांत हेडा आदिंसह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसर फुलांसह आकर्षक सजावट करण्यात आली होती. शहरातील स्टेट बँक चौक, सर्जेपुरा, दिल्लीगेट, लक्ष्मी कारंजा, माळीवाडा, नेप्तीगेट, झेंडीगेट, नेता सुभाष चौक, नालेगांव, वारुळाचा मारुती, नवग्रह मंदिर, भुतकरवाडी, श्रमिकनगर, पावन हनुमान मंदिर, बालिकाश्रम रोड, खाकीदास बाबा मठ, नित्यसेवा सोसायटी, मार्कंडेय सोसायटी गुलमोहोर रोड, तपोवन, भोसले आखाडा, अरणगाव रोड, रेल्वेस्टेशन, केडगाव, एकनाथनगर, भिंगार येथील रोकडेश्वर मंदिरावर आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठीसाठी रांगा लावल्या होत्या. हनुमान जयंतीनिमित्त गेल्या अनेक दिवसांपासून अहिल्यानगर शहरात चौका–चौकात हनुमान चालिसा पाठाचे आयोजन करण्यात आले होते.

## लिंबाजी वारंगुळे यांचे निधन

**● पाथर्डी । वीरभूमी–**



तालुक्यातील तोंडोळी येथील आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील जुन्या पिढीतील ज्येष्ठ नागरिक लिंबाजी नारायण वारंगुळे यांचे नुकतेच वयाच्या ८९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. गावातील प्रतिष्ठित व अनुभवी व्यक्तिमत्व, धार्मिक क्षेत्रात गावातील सप्ताहात महत्वाचे योगदान असणारे म्हणून त्यांची ओळख पंचक्रोशीत होती. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, सुना, नातंवड असा मोठा परिवार आहे. प्रा. सुरेश वारंगुळे, सुदाम वारंगुळे, ग्रा.पं. सदस्य राजेंद्र वारंगुळे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने गावात व पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नाकर्तेपणा झाकण्यासाठी राजेंद्र नागवडेंची केविलपाणी धडपड

### केशवराव मगर । नियमित व हंगामी कामगारांना ले-ऑफ दिल्यामुळे प्रचंड नाराजी

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

'नागवडे' कारखान्याने कामगारांना दिलेला 'ले–ऑफ' बेकायदेशीर व अन्यायकारक आहे. कारखान्याच्या दुरावस्थेला सर्वस्वी अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांचे गैरव्यवस्थापन व मनमानी कारभार कारणीभूत आहे. तरीही ले–ऑफच्या परिपत्रकात कमी गाळपाचे खापर सभासद, शेतकऱ्यांवर फोडून स्वतः ची जबाबदारी व नाकर्तेपणा झटकण्याचा प्रकार म्हणजे चोराच्या उलट्या बोंबा मारण्याचा प्रकार आहे. नागवडेंनी कामगार, सभासदांवर कमी गाळपाचे फोडलेले खापर ही खाजगीकरणाकडे वाटचाल असल्याची घणाघाती टीका कारखान्याचे माजी उपाध्यक्ष व जेष्ठ नेते केशवराव मगर यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

यासंदर्भात कारखान्याचे माजी उपाध्यक्ष श्री. मगर यांच्यासह माजी उपाध्यक्ष बाबासाहेब इथापे, जिल्हा युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष स्मितल वाबळे, कारखान्याचे माजी संचालक हरिभाऊ कुरुमकर, ॲड. बाळासाहेब काकडे, विजय कापसे, राजकुमार पाटील, अनंता पवार यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. पत्रकात म्हटले आहे की, 'नागवडे' कारखान्याने कमी गाळपाचे कारण देत कायम व हंगामी कामगारांना तिन महिन्यांचा ले–ऑफ दिला आहे. त्यांचा हा निर्णय त्यांच्या मनमानीचे द्योतकच आहे. हा बेकायदेशीर ले–ऑफ तात्काळ मागे घ्यावा. मागील दहा वर्षात 'नागवडे' कारखाना कधीच सात लाख मे.टनाचे गाळप करु शकला नाही. कारखाना क्षमतेपेक्षा कमी गाळप करतो हे अध्यक्ष नागवडे व त्यांच्या 'झेलकरी' टीमचे सपशेल अपयश आहे. विधानसभा निवडणूकीत कामगारांना प्रचारात जुंपले त्यामुळे कारखाना तब्बल पंधरा दिवस ऊशीरा सुरु झाला. ऊसदराची घोषणा हंगाम संपताना केली. शिवाय पक्षपातीपणाची ऊसतोड हे जगजाहीर आहे. हे सर्व पाप नागवडे यांचेच आहे. मात्र कामगार, सभासदांच्या माथी पाप थापण्याची त्यांची केविलवाणी धडपड असल्याची टीका या नेत्यांनी केली आहे.



विधानसभा निवडणूक प्रचारात कामगारांना वेठबिगारासारखे घरोघर फिरायला भाग पाडणारे नागवडे आता 'गरज सरो अन् वैद्य मरो' या उक्तीप्रमाणे कामगारांच्या रोजी रोटीवरच उठले असून हा कामगारांवर मोठा अन्याय आहे.

ले–ऑफच्या परिपत्रकात नागवडेंनी कमी गाळपाचे खापर सभासद–शेतकऱ्यांवर फोडले असून भागातील सभासद–शेतकरी ऊस अन्यत्र देत असल्याचे म्हटले आहे. वस्तुत: कारखान्यात अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांची मनमानी, गैरव्यवस्थापन, वारेमाप भ्रष्टाचार, बेशिस्त, ऊस नोंदी व तोडणीतील सावळा गोंधळ, ऊस तोडीत केला जाणारा टोकाचा पक्षपात, राजकारण यामुळे सभासद शेतकरी भरडून निघत असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत आहे. आमच्यापैकी अनेकांना केवळ राजकीय विरोधक असल्याने ऊसतोड दिली नाही ही वस्तुस्थिती आहे. १५/६ ची ऊस नोंद असतानाही अजनूज येथील एका सभासदाला थेट हंगाम संपताना ऊस तोड दिली. पण त्याचा सगळा ऊस आणलाच नाही असा 'महापराक्रमी' कारभार राजेंद्र नागवडे करीत आहेत. संचालक मंडळ तर केवळ नावालाच आहे. शिक्षण संस्थेतही मनमानी करताना केवळ बनवाबनवी केली जात आहे. काटकसरीने कारखाना चालवायचा आव आणनाऱ्या नागवडेंनी त्यांच्या चुकांना साथ देणाऱ्या अर्धा डझन सेवानिवृत्तांना 'अभय योजना' लागू केली असून नियमीत सेवेतील कामगारांना घरचा रस्ता दाखवला आहे. चार शेतकी अधिकारी, तिन लेबर ऑफिसर हीच नागवडे यांची काटकसर आहे का? सेवानिवृत्तांची 'फौज' यांना का हवी आहे? हे सभासदांना कळून चुकले आहे. 'नागवडे' कारखाना हा सभासदांच्या मालकीचा सहकारी साखर कारखाना असल्याचा व कारखान्याच्या मालकीची शिक्षण संस्था आम सभासदांची असल्याचा विसर अध्यक्ष नागवडेंना पडला आहे. काटकसरीचा आव आणायचा आणि ओरबाडून खायचे ही त्यांची प्रवृत्ती कारखान्याला अधोगतीकडे घेवून जात असल्याची खरमरीत टीका पत्रकात केली आहे. केवळ विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून मागील वर्षी जाहीरात न देता शेकडो कामगारांची बेकायदा भरती केली तेंव्हा अध्यक्ष नागवडेंना कारखान्याचे हित व भविष्य समजत नव्हते का? असा सवाल करुन म्हटले आहे की, कारखान्यात काम करणाऱ्या कायम कामगारांना ले–ऑफ दिला मात्र त्यांच्या घरी कारखान्याच्या पगाराने राबणाऱ्या कामगारांना कामावर ठेवले यात नागवडेंनी कोणते सभासद हित साधले? कारखान्याच्या इंधन खर्चाने फिरणारी त्यांच्या कुटूंबियांची व पदाधिकारी, अधिकाऱ्यांची वाहने आता थांबणार का ? कामे न करता व माल पुरवठा न करता लाखो रुपयांची बोगस बिले काढली जातात हे जगजाहीर आहे. बोगस बिले काढणाऱ्या बगलबच्च्यांना आवर घालणार का? कारखान्याचे अतिथीगृह एप्रिल २०१९ पासून बंद असूनही दरवर्षी लाखो रुपयांचा किराणा माल व भाजीपाला जातो कुठे ? याचे उत्तर नागवडेंनी सभासदांना देण्याची गरज आहे. कामगार व सभासदांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणाऱ्या राजेंद्र नागवडेंनी आत्मपरिक्षण करावे. व सभासद, शेतकरी, कामगारांची जाहीर माफी मागावी अशी मागणी पत्रकाद्वारे केली आहे.

कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे हे स्व.शिवाजीराबापु नागवडे यांचा वसा व वारसा असल्याचे सांगत आहेत.पण त्यांच्या सभादविरोधी कृतीने व वारेमाप उधळपट्टीने त्यांनी हा अधिकार गमावला आहे. वारसा सांगण्यापेक्षा त्यांनी स्वत:च्या कर्तबगारीचा आरसा पाहण्याची आवश्यकता आहे. सभासद, शेतकऱ्यांच्या कृपेनेच आपण सत्तेत आहोत याचा विसर नागवडे यांना पडणे त्यांचा कृतघ्नपणा सिध्द करते. कारखान्यातील नागवडे यांच्या कारभाराला कामगार, सभासद, शेतकरी पुरते वैतागले असून याबात लवकरच सहकारमंत्र्यांना भेटून कारखान्यातील गैरकाभार व भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी करणार असल्याचेही पत्रकात म्हटले आहे.

## पाणीटंचाई तीव्र झाल्याने चापडगाव नदीवरील बंधारे तातडीने भरून द्या



**● शेवगाव । वीरभूमी–**

शेवगाव तालुक्यात तीव्र पाणीटंचाई झाल्याने चापडगाव नदीवरील ताजनापूर उपसा सिंचन योजनेतून नदीवरील बंधारे तातडीने भरून द्यावे, अशी मागणी पाटबंधारे विभागाकडे करण्यात आली आहे.

जनावरांना चारा पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी व उन्हाचा पारा चाळीशी पार झाल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे. दोन वर्षापासून योजनेचे काम संथ गतीने सुरू असल्याने. मागील वर्षी दोन वेळेस चापडगाव नदीवरील बंधाऱ्यांमध्ये ताजनापुर लिफ्टचे पाणी सोडण्यात आल्याने परिसरातील अनेक विहिरींना व शेतकऱ्यांना मोठा फायदा झाला. जनावरांचा पाण्याचा प्रश्न सुटला तरी पुन्हा यावर्षी चापडगाव नदीवरील बंधारे पूर्ण क्षमतेने भरून द्यावेत, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटना व परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. तरी तातडीने उपाययोजना न केल्यास आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

यावेळी संतोष गायकवाड. दत्तात्रय फुंदे, दीपक बटुळे, राजू जिजा पातकळ जगदीश नेमाने . सुनील बटुळे शेषनारायण नाईक. सुहास गायकवाड आदी उपस्थित होते.

## नवाळी समाजाच्या मानाच्या काठीचा यात्रोत्सव उत्साहात

**● अकोले । वीरभूमी–**

महर्षी वाल्मिक ऋषी विश्वस्त मंडळ राजुर आयोजित पारंपारिक देवकाठीचे राजुर– रंधाफॉल –राजुरकडे प्रस्थान झाले. उत्साह पूर्ण वातावरणात भंडारा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सालाबादप्रमाणे पिढ्यान–पिढ्या चालत आलेली प्रथा नवाळी कुटुंबियांनी सुरू ठेवलेली आहे. ही प्रथा नवाळी कुटुंबियांनी अनेक वर्ष सुरू ठेवली असून यातून एकजूट व समाजकारण, समाज बांधिलकी जोपासण्याचे कार्य सालाबाद प्रमाणे सुरू ठेवलेले आहे. सोबत गेले सात वर्षापासून देवकाठी स्थानापन्न केल्यानंतर महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाते. त्यात पंचक्रोशीतील सातशे ते आठशे भाविक भक्त महाप्रसादाचा लाभ घेतात. दुसऱ्या दिवशी मानाच्या देवकाठीचे प्रस्थान रंधाफॉल येथील घोरपडा देवीकडे होते.



राजुर – केळुंगण – माळेगाव – कातळापुर व रंधाफॉल असे पायी दिंडी यात्रेचे स्वरूप ज्यामध्ये लहान – मोठे सर्व भाविक भक्त मोठ्या उत्साहात व आनंदाने तळपत्या उन्हात येणे – जाणे करतात, ज्यात वयवर्ष पाच वर्षा पासून ते सत्तर वर्ष पर्यंतचे भाविक भक्त सर्व नवाळी परिवार व अन्य समाज बांधव यात मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. समस्त नवाळी परिवार व सदस्यांची श्रद्धा या पारंपारिक उत्साहाला जोडलेली आहे.

# आपण काय करणार यापेक्षा आपण काय केले यावर समाज मूल्यमापन करतो

### राजेंद्र नागवडे । मुख्याध्यापक अरुण पवार यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव सोहळा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

आपण काय करणार यापेक्षा आपण काय केले यावर समाज आपले मूल्यमापन करत असतो ही जेष्ठ शिक्षक अरुण पवार यांच्या सेवा निवृत्ती कार्यक्रमाला त्यांचे प्रशासकीय सेवेत उच्चपदावर व सामाजिक, खाजगी क्षेत्रात प्रतिथयश मिळवणाऱ्या माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती पाहून श्री. पवार यांनी अनेक आदर्श पिढ्या घडवल्या असल्याचे आपल्या समोर दिसत असल्याचे प्रतिपादन नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी मढेवडगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक अरुण पवार यांचा सेवापूर्ती कार्यक्रमात केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे होते. कार्यक्रमाची सुरुवात कर्मवीर अण्णांच्या प्रतिमा पुजनाने झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक हौसराव दांगडे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी विद्यालयातील साई आवारे व प्रज्ञा उंडे या विद्यार्थिनींनी श्री. पवार सरांविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. शिक्षक भगवान दिघे यांनी भाषणातून श्री. पवार सरांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला

यावेळी श्री. पवार यांचे माजी विद्यार्थी सहाय्यक पोलीस निरीक्षक आप्पासाहेब हंडाळ यांनी 'माझे गुरु माझ्या जीवनाचे प्रेरणास्थान बनले असे भावनिक उदगार काढले. याप्रसंगी घनश्याम शेलार, नरसिंह पवार भाऊसाहेब बांदल, थोर देणगीदार व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य रवींद्र महाडिक, सुहासिनी पवार, संचालक सुभाष शिंदे, स्मितल वाबळे, संतोष गुंड यांनी श्री. पवार यांना भावी जीवनकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. अरुण पवार यांची कन्या नंदिनी हिने गीताच्या माध्यमातून मनोगत व्यक्त करताना मान्यवरांचे डोळे पाणावले. सर्व सेवकांच्या वतीने अरुण पवार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती अरुण पवार आपले विचार मांडताना सांगितले की, माझ्या ३२ वर्षांच्या सेवेत अखंडपणे ज्ञानदानाचे कार्य केले.यापुढेही मी सामाजिक कार्यात योगदान देत राहीन. रयत शिक्षण संस्थेने अरुण पवार यांच्या कामाची दखल घेत त्यांना अकोले तालुक्यातील बेलापूर बदगी याठिकाणी



सेवेच्या अखेर दोन महिन्यासाठी मुख्याध्यापकपदी पदोन्नती दिली आहे.

कार्यक्रमाला सरपंच प्रमोद शिंदे, चेअरमन प्रकाश उंडे, व्हा. चेअरमन शरद शिंदे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य विजयराव उंडे, रयत सेवक बँकेचे संचालक दिलीप तुपे, प्रशांत खामकर, जनरल बॉडी सदस्य बाजीराव कोरडे, कुंडलिक शिर्के, श्री. रायकर सर, बी. डी. शिंदे, वैभव काळूखे, प्रणव नलगे, सर्व रयत सेवक, माजी–आजी विद्यार्थी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सूत्रसंचालन भगवान दिघे व अर्चना कोरडे यांनी केले.

# नेते बदलतात, पण जनता कधीच विसरत नाही

## श्रीरामपूरसाठी डॉ. सुजय विखेंचा निर्धार | प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत दत्तनगर येथे १०१ घरकुलांचे भूमिपूजन

**● श्रीरामपूर | वीरभूमी–**

श्रीरामपूर तालुक्यातील दत्तनगर गावठाण फेज वन येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत व जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विशेष पुढाकारातून घरकुलांच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी विधिवत पूजा करण्यात आली तसेच दत्तनगर ग्रामस्थांच्या वतीने डॉ. सुजय दादांची पेढेतुला व सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. त्यांनी हा सत्कार स्वीकारून उपस्थित सर्वांशी संवाद साधला.

या कार्यक्रमात बोलताना डॉ. सुजय विखे यांनी स्पष्ट शब्दांत राजकारणाची दिशा ठरवणारे विचार मांडले. राजकारण छोट्या गोष्टीवर न होता, गरिबांना घर, शेतकऱ्यांना वीज आणि शिक्षण मिळाले पाहिजे. श्रीरामपूर बदलायच असेल तर 'तुझं-माझं' सोडून जनतेच्या हितासाठी काम करावं लागेल, असे ते म्हणाले.

तसेच ते पुढे म्हणाले की, सत्ता बदलली की काही नेते पक्ष बदलतात. परंतु गोरगरीब जनतेची सेवा केली तर जनता कधीच विसरत नाही. त्यामुळे जनतेवर विश्वास ठेवावा, पुढाऱ्यांवर नव्हे असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हा कार्यक्रम घेण्यात आल्याचा विशेष आनंद देखील त्यांनी बोलताना व्यक्त केला.

डॉ. विखेंनी जाहीर केले की, आमदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून श्रीरामपूरमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ६०० नवीन घरकुलं मंजूर झाली असून, ही घरं सोलर सिस्टिमसह उभारण्यात येणार आहेत. यामध्ये दत्तनगर हे एकत्रित केंद्र असणार आहे.

श्रीरामपूर शहरातील वाढती गुन्हेगारी, चेन स्नॅचिंग, खंडणी व महिलांवरील अत्याचार यावर भाष्य करताना डॉ. विखे म्हणाले, कोणताही समाज असो, गुन्हेगारी प्रवृत्तीला समर्थन देणार नाही. अशांना उखडून फेकलं जाईल. श्रीरामपूरच्या कायदा व सुव्यवस्थेवर कठोर पावले उचलण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले की, महामानवांच्या जयंतीत डीजे किंवा अनावश्यक खर्च न करता आरोग्य शिबिर, समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले पाहिजे. विचारांशी नातं जोडण्याचा खरा मार्ग तोच आहे.

जनतेची कामं करा, जनता आपल्याला नेता बनवते. त्यासाठी कोणत्याही शिफारशीची गरज नसते, असा मार्मिक सल्ला देखील सुजय विखेंनी संभाव्य नगरसेवकांना दिला. कार्यक्रमाच्या शेवटी त्यांनी ही फक्त सुरुवात आहे, श्रीरामपूरला आता मी वारंवार भेट देणार आहे. सर्वांनी एकत्र येऊन विकासात्मक दृष्टीने काम करूया, असं देखील मत मांडून विकासाला प्राधान्य देण्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे आश्वासन दिले.




या कार्यक्रमास भाजपचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, दीपक अण्णा पठारे, नानासाहेब शिंदे, शरद नवले, गणेश थोरात, सारिकाताई, संगीता शिंदे, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ गुदगुले, अभिषेक खंडागळे, सुरेंद्र गिरधर अलके, भीमा बागूल तसेच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी स्वच्छता महत्वाची

## डॉ. मनीषा खेडकर | बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयातर्फे उपजिल्हा रुग्णालयामध्ये स्वच्छता

**● पाथर्डी | वीरभूमी–**

स्वच्छता ही सर्वात महत्वाची सवय असून स्वच्छता आणि आरोग्य एकमेकांशी जोडलेले आहेत. जर व्यक्ती स्वच्छ असेल तर ती अनेक संसर्गजन्य आजारांशी लढू शकते आणि त्यांना रोखू शकते, स्वच्छता तुमचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य वाढवते, असे प्रतिपादन येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीषा खेडकर यांनी केले.



बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयातर्फे उपजिल्हा रुग्णालयामध्ये आयोजित स्वच्छता मोहीम प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले, डॉ. प्रल्हाद बडे, डॉ. कांबळे, आदिनाथ भोईटे, डॉ. रवींद्र भोईटे, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेखा चेमटे उपस्थित होते.

डॉ. खेडकर म्हणाल्या, स्वच्छतेचा आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतोच, शिवाय देशाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठीही ती महत्त्वाची आहे. स्वच्छतेचे महत्त्व समजून घेतले पाहिजे आणि आजारांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी मूलभूत उपायांचा अवलंब केला पाहिजे. परिसर स्वच्छता ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परिसर स्वच्छ ठेवणे ही गोष्ट वैयक्तिक व सामूहिक दृष्टीने खूप महत्त्वाची आहे या परिसराचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत असतो. परिसर स्वच्छ ठेवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. परिसर स्वच्छता एकदाच करून भागणारी गोष्ट नाही तर सतत चालणारी प्रक्रिया आहे अशा त्या शेवटी म्हणाल्या.

बाबूजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) विभागाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. प्लास्टिक, कचरा, अनावश्यक वाढलेली झुडपे, गजर गवत यांची विल्हेवाट करण्यात आली तसेच रुग्णालयाच्या आवारात असणाऱ्या झाडांना आळे करून तेथील स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त श्रमदान केले. पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या प्रेरणेने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख, प्रा. शेखर ससाणे, प्रा. सुनील कचरे, प्रा. महारुद्र घुले, प्रा. खंडेराव डोईफोडे, प्रा. मन्सूर शेख, प्रा. माया पवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. सुरेखा चेमटे यांनी स्वच्छता मोहिमेचे नियोजन केले.

# आ. सत्यजित तांबे यांच्या हस्ते मायभुमीला महात्मा फुले जीवनकार्य गौरव पुरस्कार प्रदान

**● चासनळी | वीरभूमी–**

कोपरगाव तालुक्यातील चास (नळी) येथील मायभुमी सोशल फाउंडेशनला महात्मा फुले जयंती उत्सवसमिती,एच.ए.एल.ओझरचा जीवनकार्य गौरव पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. ११एप्रिल रोजी महात्मा फुले जयंतीला किनो थिएटर, ओझर टाऊनशीप येथे आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. रोख रक्कम, सन्मानपत्र, शाल असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. या प्रसंगी आ.सत्यजित तांबे व आयोजक नितीन पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या कामाचे कौतुक करत गौरवोद्गार काढले.



मायभुमी सोशल फाउंडेशन हे दर रविवारी ग्रामस्वच्छता, स्मशान स्वच्छता व नदी स्वच्छता, वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन, शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना साहित्य वाटप व सामाजिक सलोखा टिकून ठेवण्याचे काम अविरतपणे करत आहे. स्मशानाबाबतच्या अंधश्रद्धा दुर करण्यात ते प्रयत्नशील आहेत. मृत्युनंतर अंत्यसंस्कारासाठी मदत करतांनी काही कुप्रथा रोखण्यात त्यांना यश आले आहे. विद्यार्थी व गरजुंना मदत करण्यात ते अग्रेसर असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. यावेळी सचिन चांदगुडे, संतोष पऱ्हे, कैलास माळी, विजय चव्हाणके, देविदास कासोदे, बबन गाडे, वेदांत चांदगुडे, बाळासाहेब सैंदाणे, शांताराम बिरुटे आदी कार्यकर्ते पुरस्कार स्वीकारण्यासाठी उपस्थित होते.

या पुरस्कारामुळे सामाजिक काम अधिक जोमाने करण्याची प्रेरणा मिळाली, असे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. चास (नळी) गावासाठी हा पुरस्कार हा भुषणावह बाब असल्याने गावकऱ्यांनी मायभुमी सोशल फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

# अकोले सेवा संस्थेवर शेतकरी विकास मंडळाचे वर्चस्व

## निवडणुकीत संपूर्ण पॅनलचा एकतर्फी विजय | तीन उमेदवारांची बिनविरोध निवड



**● अकोले | वीरभूमी–**

अकोले विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या झालेल्या निवडणुकीत शेतकरी विकास मंडळाचे सर्वच्या सर्व उमेदवार चांगली मते मिळवून विजयी झाले आहेत. तर ३ उमेदवार बिनविरोध निवडून आलेले आहे.

अकोले विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या १३ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर शेतकरी विकास मंडळाच्या महिला राखीव प्रवर्गातुन सौ. नाईकवाडी हिरा संतोष, सौ. झोळेकर विमल नारायण व अनुसूचीत जाती/जमाती प्रवर्गातुन जगताप दिनकर गंगाराम हे तीन उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्यानंतर सर्वसाधारण प्रवर्गाच्या ८ जागेसाठी शेतकरी विकास मंडळाचे ८ व विरोधी ३ असे एकुण ११ उमेदवार तर इतर मागास प्रवर्गच्या १ जागेसाठी ३ उमेदवार व भटक्या जाती जमाती /विशेष मागास प्रवर्गच्या १ जागेसाठी ३ उमेदवार राहिल्याने आज १३ एप्रिल २०२५ रोजी कन्या विद्यालयात शांततेत मतदान झाले. यावेळी सर्वसाधारण गटात एकुण १०७५ मतदान झाले त्यापैकी ४९ मतपत्रिका अवैध तर १०२६ वैध मतपत्रिकाची मतमोजणी होऊन यामध्ये सर्वसाधारण कर्जदार खातेदार गटातुन शेतकरी विकास मंडळाचे गायकवाड अनिल धोंडिबा ७२१ मते (विजयी), धुमाळ उत्तम रामभाऊ -७८८ मते (विजयी), धुमाळ गंगाराम पुंजा -६९७ मते (विजयी), धुमाळ वसंत सयाजी - ७९५ मते (विजयी), नवले मिलिंद भाऊसाहेब - ८५५ मते (विजयी), नवले सुनिल मनोहर- ८१२ मते (विजयी), मंडलिक एकनाथ बारकु -६९२ मते (विजयी), शेणकर दत्तात्रय विठ्ठल- ७२९ मते (विजयी) झाले तर अपक्ष उमेदवार गोर्डे हौशिराम भास्कर -३८५ (पराभूत), नाईकवाडी संतोष भिमाजी - (११४ मते) (पराभूत), शेटे सीताराम विठ्ठल -(३५५ मते) (पराभूत) तर इतर मागास प्रवर्गातुन शेतकरी विकास मंडळाचे चौधरी रामहारी भाऊसाहेब यांना ७०९ मते पडून विजयी झाले तर अपक्ष चौधरी सावळेराम तुळशीराम-(२५० मते)(पराभूत), शेटे संपत गणपत (५४ मते)(पराभूत) तसेच भटक्या जाती /जमाती विशेष मागास प्रवर्गातुन शेतकरी विकास मंडळाचे दराडे हेमंत भिकाजी हे ५८५ मते मिळवून विजयी झाले तर त्यांच्या विरूद्ध चांगली लढत देणारे अपक्ष उमेदवार विजय बाबुराव पवार हे ३८९ मते मिळवून पराभूत झाले तर दुसरे अपक्ष पवार किसन सावळेराम हे ३६ मते घेऊन पराभूत झाले.

अकोले विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या या निवडणुकीत शेतकरी विकास मंडळाचे ज्येष्ठ नेते मधुकरराव नवले, शिवाजीराजे धुमाळ, डॉ. अजित नवले, शिवसेना तालुकाप्रमुख मच्छिंद्र धुमाळ, महेशराव नवले, ॲड. के. डी. धुमाळ, भाऊपाटील नवले, संदीप दादा शेटे, रमेशराव जगताप, नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, बाळासाहेब ताजणे, बाळासाहेब नाईकवाडी, प्रकाश नाईकवाडी, प्रमोद मंडलिक, रघुनाथ शेणकर यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढली होती व या निवडणुकीत शेतकरी विकास मंडळाच्या सर्व उमेदवारांनी एकतर्फी यश मिळवले आहे. या विजयानंतर कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत जल्लोष साजरा केला.

ही निवडणूक व मतमोजणी प्रक्रियेचे योगेश नारायण कापसे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना सोसायटीचे सचिव रावसाहेब भावका नवले यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना भरत झोळेकर, कचरू गोर्डे, नंदकुमार गजे, विवेक आहेर, संदीप आरोटे, भागवत सहाणे, अशोक घोमल, अशोक कासार, माधव जाधव, विकास जाधव, निलेश आंबरे आदींनी सहकार्य केले.

या उमेदवारामध्ये माजी चेअरमन म्हणून उत्तमराव धुमाळ, अनिल गायकवाड, वसंतराव धुमाळ, गंगाराम पुंजा धुमाळ यांनी पद भूषविलेले आहे.

# संगमनेरात दोन दिवस लेखन कार्यशाळा

**● संगमनेर | वीरभूमी–**

अखिल भारतीय मराठी साहित्य संस्था शाखा संगमनेर व लाडोबा मासिक पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी व लेखकांसाठी लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती बालकुमार साहित्य संस्थेच्या अध्यक्षा दुर्गा तांबे यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या लेखन क्षमता अधिक उंचावल्या जाव्यात, लेखनामध्ये समृद्धता यावी यादृष्टीने विद्यार्थ्यांना योग्य ते मार्ग दर्शन व्हावे यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तसेच अनेक लेखक आपले लेखन प्रकाशित करणार आहेत. या कार्यशाळेमध्ये प्रत्यक्षपणे लेखन करून घेणे, विषयानुरूप कविता, कथा, ललित यांचे लेखन नेमके कसे करावे? या स्वरूपामध्ये अनुभव दिले जाणार आहेत. तसेच महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक मार्गदर्शन करणार आहेत. २६ व २७ एप्रिल रोजी संगमनेर येथे ही कार्यशाळा होणार आहे. नव्याने लिहू पाहणारे आणि यापूर्वी लेखन केलेल्या सर्वांनाच कार्यशाळेमध्ये मोफत प्रवेश असणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी व लेखकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. कार्यशाळेसाठी सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शिक्षक, पालक, विद्यार्थी यांनी प्रकल्प संयोजक दत्तात्रय आरोटे, शांताराम डोंगरे, मुकुंद डांगे, स्मिता गुणे, तुषार गायकर, शाखेचे सचिव संदीप वाकचौरे यांच्याकडे नाव नोंदणी करावी असे आवाहन प्रा. डॉ. संजय दळवी, डॉ. संतोष खेडलेकर, श्री. भुजबळ, घनश्याम पाटील, श्री. जोशी यांनी केले आहे.

याचबरोबर ज्या लेखकांना आपली पुस्तके प्रकाशित करायवयाची आहेत त्यांच्यासाठी प्रकाशकांसोबत संवाद सत्र आयोजित करण्यात आले आहे. या दोन दिवसीय कार्यशाळेत पुस्तक प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्याचाही लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. संजय मालपाणी यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या माजी अध्यक्षा तथा साहित्यिका डॉ. शकुंतला काळे, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते एकनाथ आव्हाड, ऐश्वर्य पाटेकर, सिनेगीतकार ज्योती घनश्याम, महाराष्ट्रातील नामवंत कवी शशिकांत शिंदे, ज्येष्ठ संपादक प्रकाशक घनश्याम पाटील, डॉ. संतोष खेडलेकर, नागेश शेवाळकर, प्रशांत केंदळे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.